नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ३२ Issue - 32 | वार - शुक्रवार दि. २६ जून २०२६ Blow- Friday Date 26 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## मुद्रांक नोंदणी प्रकरणातील गैरव्यवहारांच्या चौकशीसाठी स्वतंत्र टास्क फोर्स

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची विधानसभेत माहिती; आव्हाड यांची लक्षवेधी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महसूल विभागातील मुद्रांक नोंदणी प्रक्रियेत झालेल्या कथित गैरव्यवहारांची राज्यस्तरीय चौकशी आता अकाउंटंट जनरल (एजी) कार्यालयामार्फत केली जाणार असून त्यासाठी स्वतंत्र टास्क फोर्स स्थापन करण्यात येईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी हा निर्णय जाहीर केला. यावेळी सदस्य नाना पटोले यांनीही उपप्रश्न उपस्थित केला.

मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यभर झालेल्या सर्व 'डज्युडिकेशन' प्रकरणांची सखोल चौकशी एजीमार्फत करण्यात येणार आहे. केवळ चौकशीचे आदेश देऊन थांबणार नसून एजीच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र टास्क फोर्स कार्यरत केली जाईल. या चौकशीसाठी आवश्यक मनुष्यबळ, संसाधने आणि निधी राज्य शासन उपलब्ध करून देणार आहे.

ही चौकशी महसूल विभाग स्वतः करणार नसून संपूर्ण कारभार एजीकडे सोपविला जाणार असून टास्क फोर्समार्फत प्रत्येक प्रकरणाची तपासणी केली जाईल. या चौकशीत म



ुद्रांक अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबन, फौजदारी गुन्हे दाखल करणे आणि अन्य कठोर कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, वरिष्ठ लिपिक राजकुमार दहीफळे यांनी मुद्रांक अधिकारी म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर अवघ्या १० दिवसांत ९४१ हून अधिक दस्तऐवजांची नोंदणी केली. या नोंदण्यांमध्ये एमआरटीपी कायदा १९६६ आणि मुद्रांक नोंदणीसंदर्भातील कायदेशीर तरतुदींचे गंभीर उल्लंघन झाल्याचा आर-ोप आहे. अनधिकृत इम ारतींच्या नोंदणीतून शासनाला सुमारे १३ कोटी ९१ लाख रुपयांचे नुकसान झाले. या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आले आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याला सेवेतून बडतर्फ करण्याच्या दिशेने शासनाची कार्यवाही सुरू आहे.

मुद्रांक विभागातील डज्युडिकेशन प्रक्रिया 'क्वासी-ज्युडिशियल' स्वरूपाची असली तरी ती मुद्रांक अधिनियमाच्या चौकटीतच पार पडली पाहिजे, असे सांगत मंत्री बावनकुळे यांनी नव्या मानक कार्यपद्धतीचा (डजझ) आदेश जारी करण्याची घोषणा केली. यापुढे नियमबाह्य डज्युडिकेशन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तरतूद करण्यात येणार असून त्यासंदर्भातील शासन निर्णयही काढण्यात येणार असल्याचे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

## नसरापूर अत्याचार प्रकरणातील आरोपी दोषी; २९ जूनला सुनावली जाणार शिक्षा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : नसरापूर अत्याचार प्रकरणातील आर-ोपीला दोषी ठरवण्यात आलं आहे. त्याला २९ जून रोजी शिक्षा सुनावली जाणार आहे. जेव्हा हे प्रकरण उघडकीस आले, तेव्हा संपूर्ण पुणे जिल्हा आणि महाराष्ट्रात प्रचंड खळबळ माजली होती. एका चार वर्षांच्या बालिकेसोबत झालेल्या या अमानुष कृत्यामुळे स्थानिक नागरिकांनी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन केले. आरोपीला कोणत्याही परिस्थितीत जामीन मिळू नये आणि त्याला थेट फाशीचीच शिक्षा व्हावी, अशी आक्रमक मागणी नागरिक, महिला संघटना आणि विविध राजकीय पक्षांनी लावून धरली होती. अवघ्या १४ दिवसात हे प्रकरण न्यायालयासमोर नेत आरोपीला फाशीपर्यंत नेण्यात आलं आहे. शिक्षा सुनावणीदरम्यान न्यायमूत-ींनी भीमराव कांबळे याला दोषी ठरवल्यानंतर त्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. त्यानंतर भीमराव कांबळेला न्यायाधीशांनी विचारले की, 'तुला हा संपूर्ण प्रसंग आठवतो का? आता तूच सांग तुला कोणती शिक्षा द्यायची?', असा सवाल न्यायाधीशांनी विचारला. त्यावर भीमराव कांबळे याने पुन्हा आरोप फेटाळले. तो म्हणाला की, मी त्या दिवशी त्या मुलीला गाठी शेव खाण्यासाठी घेऊन गेलो होतो. त्यावेळी मी पाय घसरून पडलो आणि त्याचवेळी त्या मुलीच्या डोक्यालाही मार लागला. मी तिला शांत करण्याचा प्रयत्न केला पण ती सारखी ओरडत होती, असे भीमराव कांबळे याने म्हटले. यावर न्यायाधीश भीमराव कांबळेला म्हटले की आता तू जे सांगतो आहेस तो इतिहास झालाय, कारण तुझ्यावर गुन्हा सिद्ध झालाय. तुला कोणती शिक्षा द्यायला हवी . न्यायाधीशांच्या या म्हणण्यावर भीमराव कांबळेने कोणतेच उत्तर दिले नाही. त्यानंतर न्यायाधीशांनी त्याला खाली बसायला



सांगितले. न्यायाधीश म्हणाले की, ही घटना समाजासाठी घातक आहे. त्या दुर्दैवी मुलीवर झालेले अत्याचार न्यायालयात सिद्ध झालेत. परिस्थितीजन्य पुरावे आणि साक्षीदार यांच्या आधारे हा गुन्हा सिद्ध झाला आहे. आरोपीच्या आधीच्या गुन्ह्यांचा इतिहास पाहता तो कोणत्याही परिस्थितीत सुधरू शकत नाही. या आधीच्या दोन गुन्ह्यांमधे हा आरोपी दुर्दैवीरित्या सुटला होता. मात्र तो समाजासाठी घातक आहे. तो सुधारण्याच्या पलिकडे गेला आहे. त्यामुळे फक्त फाशी हीच या आरोपीला योग्य राहील, असे सरकारी वकील म्हणाले. आरोपीच्या वकिलांनी या गुन्ह्यातील घटनांची संगती लगत नसल्याचा युक्तीवाद केला. त्याचबरोबर आरोपीच्या वकिलांनी तो स्वत या घटनेमुळे धक्क्यात असल्याचा आणि तो ६५ वर्षांचा वृद्ध असल्याचा युक्तीवाद केला. तो वृद्ध असल्याने इतका क्रुर गुन्हा करु शकतो का? असाही आरोपीच्या वकिलांनी युक्तिवाद केला आणि जन्मठेप योग्य शिक्षा राहील असा दावा केला.

## लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाबाबत बेजबाबदार, शिवराळ भाषा खपवून घेणार नाही : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ईशान्य मुंबईचे खासद-ार संजय दीना पाटील यांनी प्रसारमाध्यम ांच्या प्रतिनिधींना धमकी दिल्याचा आणि जाहीरपणे शिवीगाळ केल्याचा प्रकार समोर आल्यानंतर राज्यभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत, महायुतीमध्ये लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाबाबत अशी बेजबाबदार आणि शिवराळ भाषा अजिबात खपवून घेतली जाणार नाही. संबंधित खासदारांना तातडीने आणि कडक शब्दांत योग्य समज देण्यात यावी, अन्यथा त्यांना कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, अशी नाराजी शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बोलून



दाखवली आहे. गुरुवारी ३ वाजता राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात या प्रकरणाबाबत तातडीची बैठक पार पडली. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बंद दाराआड झालेल्या बैठकीत खा-सदार संजय दीना पाटील यांच्या विधानाचा अत्यंत कठोर शब्दांत निषेध केला. गेल्या काही महिन्यांत शिवसेनेतील नेत्यांकडून सातत्याने जाहीरपणे वादग्रस्त विधाने केली जात आहेत. मात्र, पत्रकारांना पोलिसांसम ोर जाहीरपणे धमकावणे आणि शिवीगाळ करणे ही महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला काळीमा फासणारी घटना आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी आपली नाराजी व्यक्त केली. महायुतीची प्रतिमा अशा विधानांमुळे मलिन होत असून यापुढे अशा प्रकारची दादागिरी आणि वक्तव्ये खपवून घेतली जाणार नाहीत. खासदार पाटील यांना तातडीने समज द्या, अन्यथा गृह खाते म्हणून त्यांच्यावर कारवाई करावी लागेल, असा स्पष्ट इशारा फडणवीस यांनी दिल्याचे समजते.

### दिलगिरी व्यक्त करण्याचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सल्ला

## खासदार संजय दीना पाटलांकडून पत्रकारांना शिवीगाळ; विधानसभेत पडसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ईशान्य मुंबईचे शिवसेना खा-सदार संजय दीना पाटील यांनी प्रसारमाध्यम ांच्या प्रतिनिधींना अत्यंत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत जाहीरपणे धमकावल्याचा खळबळजनक प्रकार गुरुवारी समोर आला. 'उबाठा' गटातून नुकताच शिवसेनेत प्रवेश केलेल्या खासदार पाटलांच्या या अरेरा-वीचे पडसाद राज्य विधानसभेतही उम टले. काँग्रेस आमदार नाना पटोले यांनी हा मुद्दा विधानसभेत मांडत खासदारांच्या वर्तनाचा तीव्र निषेध केला. या पार्श्वभूम ीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे (एज़ परींह डहळपवश) यांनी तातडीने हस्तक्षेप करत, लोकशाहीत पत्रकारांचा अवमान कोणत्याही परिस्थितीत योग्य नाही; नकळत चूक झाली असल्यास संजय दीना पाटलांनी माध्यमांची जाहीर दिलगिरी व्यक्त करावी, असा सल्ला दिला आहे.



काही दिवसांपूर्वी 'उबाठा' गटाच्या नेत्यांना प्रत्युत्तर देताना खासदार संजय दीना पाटील यांनी, 'माझ्या वाट्याला जाणाऱ्यांना मी एकतर हॉस्पिटलमध्ये पाठवेन नाहीतर स्म शानात पाठवेन, आमच्या घराण्यात आम्ही एकेकाळी पाच लोकांचे खून पाडलेत', असा दावा केला होता. या चिथावणीखोर वक्तव्यावरून उबाठा गटाचे खासदार (णइढ ) संजय राऊत यांनी मुंबई पोलीस आयुक्तांना पत्र लिहून पाटलांवर कठोर कारवाईची म ागणी केली होती. याच कारवाईसंदर्भात आणि त्यांची मुलगी व उबाठा गटाची नगरसेविका (छरसीशींरज्ञ) राजुल पाटील यांच्या राजकीय भूमिकेबाबत प्रश्न विचारण्यासाठी गेलेल्या पत्रकारांवर खासदार पाटील यांचा पारा चढला. प्रसारमाध्यमांवर संतापत त्यांनी अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन शिवीगाळ केली. तुम्ही परत इकडे आलात तर मी तुम्हाला मारून पाठवेन. हे कॅमेऱ्यात रेकॉर्ड करा... परत आलात तर मारून पाठवेन. हे मी तुम्हाला पोलिसांसमोर सांगतोय, तुम्हाला काय करायचंय ते करा, अशी खुली धमकी त्यांनी दिली. मी जे बोललोय ते उघडपणे बोललोय, माझ्यावर काय कारवाई करायची असेल ती पोलीस करतील, मी चौकशीला तयार आहे, असे सांगत त्यांनी आपल्या अरेरावीचे समर्थन केले.



## संपादकीय....

### मुद्रांक घोटाळा

महसूल विभागातील मुद्रांक नोंदणी प्रक्रियेत झालेल्या कथित गैरव्यवहारांची राज्यस्तरीय चौकशी आता अकाउंटंट जनरल (एजी) कार्यालयामार्फत केली जाणार असून त्यासाठी स्वतंत्र टास्क फोर्स स्थापन करण्यात येणार आहे. विधानसभा सदस्य जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना महसूलमंत्र्यांनी नुकताच हा निर्णय जाहीर केला. १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यभर झालेल्या सर्व 'डज्युडिकेशन' प्रकरणांची सखोल चौकशी एजीमार्फत करण्यात येणार आहे. केवळ चौकशीचे आदेश देऊन थांबणार नसून एजीच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र टास्क फोर्स कार्यरत केली जाईल. या चौकशीसाठी आवश्यक मनुष्यबळ, संसाधने आणि निधी राज्य शासन उपलब्ध करून देणार आहे. ही चौकशी महसूल विभाग स्वतः करणार नसून संपूर्ण कारभार एजीकडे सोपविला जाणार असून टास्क फोर्समार्फत प्रत्येक प्रकरणाची तपासणी केली जाईल. या चौकशीत मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबन, फौजदारी गुन्हे दाखल करणे आणि अन्य कठोर कारवाई केली जाणार आहे. वरिष्ठ लिपिक राजकुमार दहीफळे यांनी मुद्रांक अधिकारी म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर अवघ्या १० दिवसांत ९४१ हून अधिक दस्तऐवजांची नोंदणी केली. या नोंदण्यांमध्ये एमआरटीपी कायदा १९६६ आणि मुद्रांक नोंदणीसंदर्भातील कायदेशीर तरतुदींचे गंभीर उल्लंघन झाल्याचा आरोप आहे. अनधिकृत इमारतींच्या नोंदणीतून शासनाला सुमारे १३ कोटी ९१ लाख रुपयांचे नुकसान झाले. या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आले आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याला सेवेतून बडतर्फ करण्याच्या दिशेने शासनाची कार्यवाही सुरू आहे. मुद्रांक विभागातील डज्युडिकेशन प्रक्रिया 'क्वासी-ज्युडिशियल' स्वरूपाची असली तरी ती मुद्रांक अधिनियमाच्या चौकटीतच पार पडली पाहिजे, असे सांगत मंत्री बावनकुळे यांनी नव्या मानक कार्यपद्धतीचा (डजझ) आदेश जारी करण्याची घोषणा केली. यापुढे नियमबाह्य डज्युडिकेशन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तरतूद करण्यात येणार असून त्यासंदर्भातील शासन निर्णयही काढण्यात येणार आहे.

# छ.शाहू महाराजःकला क्षेत्रात स्पृहणीय कामगिरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

(२६ जून: छ.शाहू महाराज जयंती व सामाजिक न्याय दिन)

राजर्षी शाहू महाराजांची विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी भेट झाली. बाबासाहेबांच्या मूकनायक या वृत्तपत्रास व पुढे त्यांच्या इंग्लंडमधील उच्चशिक्षणास त्यांनी अर्थसाहाय्य केले. माणगाव व नागपूर येथील अस्पृश्यता निवारण परिषदांत त्यांच्याबरोबर सहभागी होऊन अस्पृश्यांना त्यांचा खरा पुढारी मिळाल्याबद्दल त्यांनी त्यांचा गौरव केला. अस्पृश्यतेबरोबरच जातिभेदाशी त्यांनी अखेरपर्यंत संघर्ष केला. आंतरजातीय विवाह हा जातिभेदावर रामबाण उपाय वाटून त्यांनी आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. स्वत: पुढाकार घेऊन अनेक आंतरजातीय विवाह घडवून आणले. तसेच बालविवाहास प्रतिबंध करून नोंदणी विवाहाचा कायदा जारी केला. घटस्फोटास व विधवापुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली. कुटुंबात होणाऱ्या शारीरिक व मानसिक छळांपासून स्त्रीला संरक्षण देणारा कायदाही त्यांनी मंजूर केला. मागासलेल्या वर्गांतील मुलींना व स्त्रियांना मोफत शिक्षणाची सुविधा निर्माण केली. आपली राजकीय कारकीर्द समस्त समाजांना न्याय देण्यात खर्ची घातली होती, म्हणूनच त्यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून उत्साहाने साजरी केली जाते.

सामाजिक सुधारणांबरोबरच त्यांनी शेतीस व उद्योगधंद्यांस प्रोत्साहन दिले. अनेक कृषी व औद्योगिक प्रदर्शने भरविली. पन्हाळ्यावर चहा, कॉफी, रबर यांच्या लागवडींचे प्रयोग केले. कृषी उत्पादनासाठी शाहूपुरी, जयसिंगपूर यांसारख्या बाजारपेठा वसविल्या. त्यामुळे कोल्हापूर ही गुळाची बाजारपेठ म्हणून देशात प्रसिद्ध पावली. शाहूंनी कोल्हापुरात कारखानदारीचा पाया रचला. शाहू मिलची स्थापना करून आधुनिक वस्त्रोद्योगास त्यांनी चालना दिली. शाहूंनी बांधलेले राधानगरीचे धरण कृषी क्षेत्रात संस्थानचा कायापालट करणारा उपक्रम ठरला. संस्थानी मुलखातील हे सर्वांत मोठे धरण बांधून त्यांनी आपले संस्थान सुजलाम्-सुफलाम् करून टाकले. त्यांनी सहकारी संस्थांचा कायदा करून सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली.



छत्रपती शाहू महाराज कोल्हापूर महाराष्ट्रातील करवीर तथा कोल्हापूर संस्थानचे प्रागतिक अधिपती आणि थोर समाजसुधारक होत. प्राथमिक शिक्षण, जातिभेद-निवारण, अस्पृश्यता-निवारण आदी सुधारणांचे पुरस्कर्ते होते. त्यांचा जन्म दि.२६ जून १८७४ रोजी कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई या दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव यशवंतराव होते. चौथ्या शिवाजींच्या अकाली निधनानंतर ते दि.१७ मार्च १८८४ रोजी कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले. राजकोट व धारवाड येथे त्यांचे शिक्षण झाले. सर फ्रेझर व रघुनाथराव सबनीस यांसारखे गुरू त्यांना मिळाले. विद्यार्थिदशेत त्यांनी इंग्रजी, संस्कृत, इतिहास, राज्यशास्त्र इ. विषयांचा अभ्यास केला. त्यांना दि.२ एप्रिल १८९४ रोजी राज्याधिकार प्राप्त झाला. तत्पूर्वी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्येबरोबर सन १८९१ साली त्यांचा विवाह झाला. त्यांना राजाराम व शिवाजी हे दोन मुलगे आणि राधाबाई-आक्कासाहेब व आऊबाई या दोन कन्या झाल्या. त्यांनी प्रशासन- यंत्रणेनची पुनर्रचना करून बहुजन समाजातील कर्तबगार व गुणी व्यक्तींना अधिकारावर नेमण्यास सुरुवात केली. सन १८९७-९८ साली प्रथम दुष्काळ व नंतर प्लेग अशी संकटे कोसळली.

मागासलेल्या जातींत शिक्षणाबद्दल फारशी आस्था नसल्याने व त्याचे कारण शिक्षण घेऊनही सरकारी नोकरी लाभण्याची शक्यता नसल्याने त्यांनी दि.२६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानातील ५० टक्के शासकीय नोकऱ्या मागास वर्गासाठी राखीव ठेवल्याचा जाहीरनामा काढला. राखीव जागांचे धोरण अमलात आणणारे ते भारतातील पहिले राज्यकर्ते ठरले. अस्पृश्यतेचे उच्चाटन हे आपले जीवितकर्तव्य मानले. संस्थानातील शाळा, पाणवठे, विहिरी, दवाखाने, कचेऱ्या आदी सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळण्यास त्यांनी कायद्याने प्रतिबंध केला. त्यासाठी अनेक वटहुकूम जारी केले. त्यांनी अस्पृश्यांना सरकारी नोकरीत घेतले. समाजातील तलाठ्यासारख्या प्रतिष्ठेच्या जागा दिल्या. त्यांच्यापैकी अनेकांना माहूत, हूलस्वार, पोलीस, स्वत:चे मोटारचालक म्हणून नेमले. भटक्या व विमुक्त जातींना जवळ करून त्यांचे जीवन स्थिर केले. त्यांना आपले रक्षक म्हणून नेमले. खेड्यापाड्यांतील बलुतेदारांनाही त्यांच्या बलुतेपद्धतीतून मुक्त करून त्यांना समाजातील सर्व उद्योगधंदे खुले केले. जोगिणी व देवदासी प्रथेस प्रतिबंध करणारा कायदा जारी केला.

सन १९०२ साली सातव्या एडवर्डच्या राज्यारोहणानिमित्त त्यांनी युरोपचा दौरा केला. तेथील भौतिक प्रगतीचा मोठा प्रभाव त्यांच्यावर पडला; त्यामुळे त्यांचे अनुभवविश्व समृद्ध झाले. बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र, अज्ञान व अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत, हे जाणून त्यांनी शिक्षणाच्या, विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. त्यानुसार त्यांनी आपल्या संस्थानात सन १९१७मध्ये सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो अमलात आणला. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केली. ते शिक्षणसम्राट महात्मा फुलेंच्या सत्यशोधक विचारसरणीकडे आकृष्ट झाले. सत्यशोधक तत्त्वांना त्यांचा पाठिंबा होता. मराठ्यांसाठी सन १९२०मध्ये स्वतंत्र क्षात्र जगद्गुरू पद निर्माण करून त्यावर सदाशिवराव पाटील या उच्चविद्याविभूषित तरुणास नेमले. त्यांनी संगीत, नाट्य, चित्रकला, मल्लविद्या आदी कलांना राजाश्रय देऊन महाराष्ट्रात कलेच्या क्षेत्रात स्पृहणीय कामगिरी केली. अनेक गायक-गायिकांनी त्यांच्या आश्रयाने भारतभर कीर्ती संपादन केली. त्यांनी अनेक नाटक कंपन्यांना व गुणी कलावंतांना आश्रय दिला. मल्लविद्येच्या प्रांतात त्यांनी संस्थानासह सर्व देशांतील मल्लांना उदार आश्रय दिला. रोमच्या आखाड्याच्या धर्तीवर कोल्हापुरात कुस्तीचे मैदान बांधले. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर ही मल्लविद्येची पंढरी बनली. दस्तूरखुद्द महाराज हे मल्लांचे मल्ल म्हणून प्रसिद्ध होते. पट्टीचा शिकारी म्हणून त्यांचा लौकिक होता. छ.शाहूंच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून कानपूर येथे कुर्मी क्षत्रिय सभेने सन १९१९ साली त्यांना राजर्षी पदवी बहाल केली. त्यांच्या कार्यामुळे दलित-पतितांचा उद्धारक, रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यात निर्माण झाली. या राजाने अज्ञानी बहुजन समाजाला जागृत करण्याचे व्रत अखेरपर्यंत सांभाळले.

अखेरच्या दिवसांत द्वितीय चिरंजीव शिवाजी यांच्या अपघाती निधनाने सन १९१८मध्ये ते खचून गेले, तशातच मधुमेहाने ते ग्रासले होते. अखेर मुंबई येथे दि.६ मे १९२२ रोजी त्यांचे वयाच्या अवघ्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यानंतर त्यांचे पुत्र राजाराम महाराज कोल्हापूरच्या गादीवर आले.

!! सामाजिक न्याय दिन व पावन जयंतीनिमित्त त्यांना व त्यांच्या लोककल्याणकारी कार्यांना मानाचा लवून मुजरा !!

**– श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी– दिनविशेषकार.**
**(भारताच्या वैभवशाली इतिहास-अस्मितेचे गाढे अभ्यासक.)**
**मु. रामनगर वॉर्ड नं.२०, गडचिरोली.**
**जि. गडचिरोली,**
**मोबा. ९६९९८३६७१७.**

# पडघ्यात व्हॉट्सप डीपी स्कॅमचा धुमाकूळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव :भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरात सध्या व्हॉट्सप डीपी (ऊ्ीश्रिू झळर्लीीश) स्कॅमने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले आहे. अज्ञात सायबर भामटे स्थानिक दुकानदारांचे फोटो वापरून त्यांच्या नावाने व्हॉट्सप वर फोटो ठेऊन , ओळखीच्या ग्राहक व मित्रमंडळींकडे ऑनलाइन पैशांची मागणी करत असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. गेल्या तीन दिवसांत पडघा परिसरातील अनेक दुकानदारांना या फसवणुकीचा फटका बसल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भामटे प्रथम परिसरातील दुकानदारांचे मोबाईल क्रमांक मिळवतात. त्यानंतर संबंधित दुकानदारांचे सोशल मीडिया किंवा व्हॉट्सपवरील फोटो डाउनलोड करून नवीन क्रमांकावर प्रोफाइल फोटो म्हणून वापरतात. त्यानंतर दुकानदारांच्या परिचित व्यक्तींना किंवा ग्राहकांना संदेश पाठवून तातडीची गरज असल्याचे सांगत क्यूआर कोड पाठवून पैसे मागितले जातात. या प्रकारामुळे अनेक नागरिकांची फसवणूक होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काही ग्राहकांनी संबंधित व्यक्तीला ओळखीचा दुकानदार समजून पैसे पाठवल्यानंतर त्यांना फसवणुकीची जाणीव झाली. त्यामुळे परिसरात चिंता व्यक्त केली जात आहे.

**दुकानदारांचे फोटो वापरून पैशांची मागणी**

एका स्थानिक दुकानदाराने सांगितले की, आमचा मोबाईल नंबर सर्वसामान्यांसाठी उपलब्ध असल्याने कोणतीही व्यक्ती आमचा फोटो वापरून गैरवापर करू शकते. अशा प्रकारामुळे आर्थिक नुकसान होण्याबरोबरच आमच्या प्रतिष्ठेलाही धक्का बसत आहे.

घटनेची माहिती मिळताच अनेक दुकानदारांनी पडघा पोलीस ठाणे गाठून सायबर सेलमध्ये तक्रारी दाखल केल्या आहेत. पोलिसांनी संबंधित मोबाईल क्रमांकांचा शोध घेण्यास सुरुवात केली असून, या फसवणुकीमागील टोळीचा तपास सुरू केला आहे. तसेच परिसरात सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती करण्याचे कामही सुरू करण्यात आले आहे. दरम्यान, पडघा पोलिसांनी नागरिकांना सतर्कतेचे आवाहन केले आहे. ओळखीच्या व्यक्तीकडून नवीन किंवा अनोळखी क्रमांकावरून पैशांची मागणी आल्यास थेट फोन करून खात्री करावी. कोणत्याही परिस्थितीत केवळ व्हॉट्सप संदेश किंवा क्यूआर कोडच्या आधारे पैसे पाठवू नयेत. तातडीच्या नावाखाली येणाऱ्या संदेशांना बळी पडू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. पडघा परिसरात आणखी कोणासोबत अशा प्रकारची फसवणूक झाली असल्यास त्यांनी तात्काळ पडघा पोलीस ठाणे किंवा सायबर हेल्पलाइनशी संपर्क साधावा, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे. नागरिकांनी सतर्क राहून सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकू नये, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# पीएम स्वामित्व योजनेअंतर्गत ड्रोनद्वारे सर्व्हे करून मालमत्ता कार्डाचे वाटप करा!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कैलास आंधळे/चिखली तालुका प्रतिनिधी :चिखली तालुक्यातील सर्वात जास्त लोकसंख्येचे गाव असलेले मेरा बुद्रुक येथिल गावठाण हद्दीत येत असलेल्या मेरा बुद्रुक फाटा वस्ती सह इतर वस्तीत अनेक वर्षापासून राहत असलेल्या नागरिकांना मालमत्ता कार्ड मिळत नसल्याने व त्यांच्या जागेचा देवाण घेवाण व्यवहार होत नसून त्यांना घरकुलाचा लाभ,कर्ज काढणे,पक्का गाव नमुना आठ तसेच शासनाच्या अनेक लाभापासून वंचित असणाऱ्या नागरिकांना त्यांच्या हक्काच्या जागेचा अधिकृत मालकी हक्क मिळवून देण्यासाठी पीएम स्वामित्व योजने अंतर्गत ड्रोनद्वारे अचूक सर्व्हेक्षण करावे व तातडीने मालमत्ता कार्डाचे वाटप करण्यात यावे, अशी आग्रही मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष श्री.गजानन वायाळ यांनी जिल्हा भूमी अभिलेख अधीक्षकांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

**गजानन वायाळ यांची जिल्हा भूमीअभिलेख अधीक्षकांकडे महत्वपूर्ण मागणी**

या संदर्भात गजानन वायाळ यांनी जिल्हा भूमी अभिलेख अधीक्षकांची भेट घेऊन त्यांना सविस्तर मागण्यांचे निवेदन सोपवले.या वेळी त्यांच्यासोबत मेरा बुद्रुक फाटा वस्तीवरील नागरिक उपस्थित होते.जिल्हा भूमी अभिलेख अधीक्षकांनी गजानन वायाळ यांचे निवेदन स्वीकारले असून,या मागणीची गांभीर्याने दखल घेतली जाईल, असे आश्वासन दिले.तसेच शासनाच्या निर्देशानुसार ड्रोन सर्व्हेच्या कामाला गती देऊन मालमत्ता कार्ड वाटपाची प्रक्रिया अधिक सुटसुटीत केली जाईल, असेही त्यांनी याप्रसंगी स्पष्ट केले.

या मागणीमुळे मेरा बुद्रुक फाटा वस्तीवरील नागरिकांमधून समाधान व्यक्त होत असून, आता भूमी अभिलेख विभाग यावर काय पावले उचलतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**ड्रोन सर्व्हेक्षणामुळे सर्वसामान्यांच्या घरांचे हक्क सुरक्षित होतील. शासनाने पीएम स्वामित्व या योजनेला गती देऊन प्रत्येक नागरिकाला त्याचे मालमत्ता कार्ड लवकरात लवकर द्यावे,जेणेकरून नागरिक घरकुल व शासनाच्या विविध योजनेचा फायदा घेऊ शकेल.सर्व्हेक्षण पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना कार्यालयाचे हेलपाटे मारावे लागू नयेत,यासाठी थेट मालमत्ता कार्डाचे जलद गतीने वाटप व्हावे. अन्यथा नागरिकांच्या हक्कासाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.**

**– श्री.गजानन वायाळ**
**जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

# क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले समाजरत्न पुरस्कार वितरण २०२६ लातूर येथे सोहळ्याचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही पारंपरिक कला महोत्सव लातूर २०२६ तसेच क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले समाजरत्न पुरस्कार वितरण सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा माजी खासदार प्रा. डॉ. ॲड. सुनीलजी बळीराम गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आला असून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. आ. प्रा. रमेश अप्पा कराड भूषविणार आहेत. तर कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटक सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणून उपस्थित राहणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा शिक्षक आमदार विक्रम बप्पा काळे, डी वाय एस पी समीरसिंह साळवे या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण सुप्रसिद्ध अभिनेत्री मैथिली वारंग यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या महोत्सवात पारंपरिक लोककला, सांस्कृतिक सादरीकरणे, लोकनृत्य, गायन, सामाजिक संदेश देणारे कार्यक्रम तसेच विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. समाजातील कला, संस्कृती व सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तींचा गौरव हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. कार्यक्रमासाठी राज्यभरातील कलाकार, समाजसेवक, महिला कार्यकर्त्या, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी सहभागी होणार असून महोत्सवामुळे लातूरच्या सांस्कृतिक वैभवाला नवी उभारी मिळणार आहे.

हा भव्य सोहळा शनिवार, दि. २७ जून २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता भालचंद्र ब्लड बँक मध्यवर्ती बसस्थानकाच्या पाठीमागे, लातूर येथे कार्यक्रम संपन्न होणार आहे.

महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशनच्या वतीने सर्व नागरिक, कला रसिक, समाजसेवक व विविध क्षेत्रातील मान्यवरांना या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पारंपरिक कला संवर्धनाबरोबरच समाजातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करणारा हा महोत्सव लातूरकरांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.

या कार्यक्रमात दुसरे मुख्य आकर्षण स्वाती पुणेकर लावणी सम्राज्ञी, हभप सरिताताई गोळेगावकर जालना, शाहीर सम्राट रत्नदीप घाडगे, चंद्रपूरची सिफा पवार,तसेच बल्लारशाच्या सुप्रसिद्ध रमाईकार गायत्री रामटेके, सुप्रसिद्ध भारुडकार अनिल गवळी व हरिभाऊ जाधव, वासुदेव श्रीनिवास पेंढारकर,गायिका उषाताई धावारे व मधुबाई आवटे,तसेच वाघ्या मुरळी सुवर्णा झुंजरुटे व संजय झुंजरुटे,संभळ वादक गायक अर्जुन पाचंगे, तसेच नागपूर व अकोला शाहीरसम्राट प्रदिप कडबे व सदानंद मोरे, मंदाताई वाघमारे, हभप. मिराताई सुरवसे, हभप. अंजलीताई माने ईत्यादि कलाकारांची हजेरी लागणार आसुन याप्रसंगी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले समाजरत्न,कलारत्न पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.यात डॉक्टर, इंजिनिअर ,शिक्षक,

पत्रकार व शासकीय अधिकारी तसेच राजकीय सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात येणार आहे.यात हभप सरिताताई गोळेगावकर, शर्मिला नलावडे,संगिता गायकवाड, उषाताई राठोड, गोविंद शिंगडे, रविंद्र राजेगावकर, अफजलमियाँ कुरेशी, समीर सय्यद,प्रताप माने, विष्णू भिसे, संतोष भोजने, बालासाहेब गाडे, लक्ष्मण कांबळे, सचिन अर्जुने, सुधाकर रणदिवे, खैरनार पांडूरंग, शेख गुलाम, धनंजय कांबळे,सोनाली जाधव, बापू खोसे,करुणाताई कांबळे, डॉ श्रीहरी बुडगेमवार,सुमती नलावडे,प्रा.रमेश भारती,प्रा.शिल्पा दाडगे,लक्ष्मण शिंदे, निवृत्ती जाधव, राजकुमार जाधव, किशोर कांबळे, इंजि. प्रविणकुमार अंबुलगेकर, सविता कांबळे,उमेश पाटील, ईत्यादि मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे पंकज भाऊ काटे, सिद्धार्थ कवठेकर,अनिस पठाण,बापू खोसे, सुरेखा पाटील, हभप महादेव महाराज तसेच श्रीराम घुले, चंद्रकांत वायाळ, विनायक काळे, उद्धव जाधव,उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमासाठी अनिस पठाण, पत्रकार संतोष सोनवणे, आकाश कांबळे,अमजद मणियार,सहारा शेख, सुरेखा घोडके,अनिता दोरवे, गंगासागर ढवळे,कय्युम सय्यद, उपस्थित राहणार आहेत सुत्रसंचलन सुरज मांदळे,प्रा.महादेव गपाट असुन कार्यक्रमाचे आयोजक लातूर येथील समाजसेवक सुफी सय्यद शमशोद्दीन असुन कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन सुफी सय्यद शमशोद्दीन यांनी केले आहे.

# पार्वती कन्या प्रशालेतील विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुळजापूर/प्रतिनिधी : जळकोट तालुका तुळजापूर येथील पार्वती कन्या प्रशालेतील २०० विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ. नशामुक्त भारत अभियान, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग सहाय्यक उपायुक्त सामाजिक न्यायविभाग धाराशिव जिल्हा समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद धाराशिव आणि नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य चे धाराशिव जिल्हा संघटक तथा राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार प्राप्त श्री. मारुती बनसोडे यांनी आज पार्वती कन्या प्रशालेतील २०० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि व्यसनमुक्तीची शपथ दिली. सध्या अमली पदार्थ सेवन विरोधी सप्ताह सुरु आहे त्यानिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. लता सोमवंशी - कदम व सर्व शिक्षक उपस्थित होते. यावेळी राहुल सोनवणे सामाजिक कार्यकर्ते हे ही उपस्थित होते.मारुती बनसोडे यांनी दारू, तंबाखू, गुटखा, सिगारेट, ड्रग्स या व्यसनामुळे युवापिढी चे प्रचंड नुकसान होत आहे याची जाणीव करुन दिली आणि आपण व्यसनापासून अलिप्त राहण्याचे आवाहन केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आषाढी वारीत भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## वारकऱ्यांच्या सेवेसाठी शासन सज्ज; आषाढी वारीसाठी सर्व विभागांकडून सुविधांची व्यापक तयारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आषाढी वारी ही वारकरी संप्रदायाच्या श्रद्धेचा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा महत्वपूर्ण सोहळा आहे. यंदाच्या वारीत लाखो भाविकांची कोणतीही गैरसोय होणारं नाही यासाठी सर्व विभागांच्या समन्वयातून व्यापक नियोजन करण्यात यावे. वारीचा उपक्रम डिस्कव्हरी व जिओग्राफी दूरचित्रवाहिनीद्वारे जगभरात पोहचणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानभवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील आषाढी एकादशीच्या अनुषंगाने पूर्वतयारीबाबत आढावा बैठक झाली, त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, पालखी सोहळा प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मागील वर्षी निर्मलवारी उपक्रम प्रभावीपणे राबविला असून यंदाचीही वारी सर्वांच्या सहकार्याने आणि पांडुरंगाच्या आशिर्वादाने यशस्वीपणे पार पडेल असे नियोजन करावे. यंदाच्या वारीसाठी पालखी मार्गावरील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती आणि मजबुतीकरण करण्यात आले. तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून विविध विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत. त्यामुळे पालखी मार्गावरील प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ होणार आहे. वारकऱ्यांच्या मुक्कामस्थळी मोठ्या प्रमाणावर जर्मन हँगर उभारण्यात आले असून संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज तसेच इतर पालख्यांच्या मुक्कामस्थळी जर्मन हँगरची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे लाखो वारकऱ्यांना सुरक्षित आणि प्रशस्त निवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

पुणे विभागाबाहेरील पालख्यांनाही सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी सोलापूर जिल्ह्यांचे पालकमंत्री यांची नोडल पालकमंत्री व पुणे विभागीय आयुक्त यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. डीजे मुक्त वारी सोहळ्यासाठी पोलीस प्रशासनाने सर्वांशी चर्चा करून प्रयत्न करावेत. वारी सोहळा हा पारंपरिक पद्धतीनेच साजरा करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

### डिस्कव्हरी व जिओग्राफी दूरचित्रवाहनीद्वारे वारी सोहळा पोहचणार जगभर

पालखी सोहळा प्रमुखांनी केलेल्या मागण्याचा सकारात्मक विचार केला जाईल असे ही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले.आषाढी वारी हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचा आत्मा आहे. लाखो वारकरी भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून वारकऱ्यांना सर्वोत्तम सुविधा द्याव्यात. यंदाची वारी अधिक सुरक्षित, सुकर आणि संस्मरणीय करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.



उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, पालखी सोहळा प्रमुखांनी ज्या ज्या मागण्या केल्या होत्या त्याप्रमाणे पालखी सोहळ्यातील सर्व कामे पूर्ण केली आहेत. महिलांसाठी रात्रीच्या मुक्कामाची विशेष सुरक्षितता घेतली आहे. वारकरी आणि भक्तांची काळजी घेत हा सोहळा चांगल्या प्रकारे साजरा करण्याचे आवाहनही यावेळी उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी केले.

ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, पालखी मार्गावर वारकरी आणि भक्तांसाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.पालखी सोहळ्यात वारक-यांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली आहे.पंढरपूर शहरात वारी सोहळ्यात आणि सोहळ्यानंतर स्वच्छतेचे सर्व नियोजन केले असल्याचे ही पालकमंत्री गोरे यांनी यावेळी सांगितले.

पुणे विभागीय आयुक्त शितल तेली - उगले यांनी सादरीकरणाद्वारे प्रशासनाने केलेल्या तयारीची माहिती दिली. बैठकीस संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हा प्रशासन, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, पाणीपुरवठा, पोलीस आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

---

# वालधुनी नदीपात्रातील कचऱ्याबाबत नगरसेविका माया कांबळे आक्रमक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी बाळासाहेब अहिरे/कल्याण : पावसाळ्याच्या सुरुवातीलाच वालधुनी नदीपात्रात मोठ्या प्रमाणात कचरा आणि गाळ साचल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे वालधुनी, अशोकनगर व परिसरातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दरवर्षी पावसाचे पाणी घरांमध्ये शिरून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. मात्र यंदाही नदी व नाल्यांची पुरेशी स्वच्छता न झाल्याचा आरोप होत आहे.

प्रभाग क्रमांक १० च्या शिवसेना नगरसेविका माया कांबळे यांनी वालधुनी नदीपात्राची पाहणी करून प्रशासनाच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली. नदीपात्रात साचलेला कचरा व गाळ तातडीने हटविण्यात यावा, अन्यथा पावसाळ्यात नागरिकांना गंभीर समस्यांना सामोरे जावे लागेल, असे त्यांनी सांगितले.

महापालिकेने पावसाळ्यापूर्वी नालेसफाई आणि नदी स्वच्छतेची कामे पूर्ण करणे अपेक्षित होते. मात्र अनेक ठिकाणी अद्यापही कचरा साचलेला दिसत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाने तात्काळ कारवाई करून नदीपात्र व नाल्यांची स्वच्छता करावी, अशी मागणी माया कांबळे यांनी केली आहे.

# एमआयटी एडिटिंविद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : निरोगी वृद्धत्वासाठी योग या संकल्पनेवर आधारित येथील एमआयटी आर्ट डिझाईनिंग अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठात सामूहिक योगासनाच्या प्रात्यक्षिकाद्वारे बारावा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहा मध्ये साजरा करण्यात आला.

समग्र विश्वासाला शांततेचा संदेश देणारा संत ज्ञानेश्वर महाराज विश्वशांती उंटाच्या साक्षीने झालेल्या या योग उत्साहात विद्यार्थी, पालक, शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी, उस्फुर्त सहभाग नोंदवला यावेळी उपस्थित त्यांनी निरोगी जीवनासाठी दररोज योगाभ्यास करण्याचा संकल्प केला.

हा आंतरराष्ट्रीय योग दिन जगातील सर्वात 'विश्वशांती घुमट'दरवर्षीप्रमाणे साजरा करण्यात आला. भारत सरकारच्या आयुष्य मंत्रालय आंतरराष्ट्रीय नॅचरोपती संघटना मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थान आर्ट ऑफ लिविंग सूर्या फाउंडेशन आय 'एम आय टी ए टी डी'स्कूल ऑफ होली स्टिंग डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने, कार्याध्यक्ष प्रा.डॉक्टर मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य योग उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठाच्या कार्यकारी संचालिका प्रा. डॉ. सुनिता कराड, प्रा .डॉक्टर राजेश यश, प्र. कुलगुरू डॉक्टर मोहित दुबे, डॉक्टर ज्ञानदेव निलवर्ण, कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक, डॉक्टर अतुल पाटील, क्रीडा संचालक प्रा .पद्माकर फंड, कॅम्पस संचालक दिलीप पाटील आदिजन उपस्थित होते.

# कळंब पोलीस ठाण्याची मोठी कारवाई अवैध गुटखा वाल्यांचे धाबे दणाणले




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : कळंब पोलीस ठाण्याची मोठी कारवाई अवैध गुटखा वाल्यांचे धाबे दणाणले. दि. २२/०६/२०२६ रोजी पोलीस ठाणे कळंब चे पोलीस निरीक्षक शकील शेख व त्यांचे पथकाने मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. संजय पवार यांचे मार्गदर्शना खाली कळंब शहरामध्ये अवैध गुटखा व प्रतिबंधीत तंबाखुजन्यं पदार्थावर मोठी कार्यवाही केली असुन गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या बातमीवरुन शहरातील पापडे गल्ली येथील सोमनाथ क्षीरसागर यांचे मालकीच्या गोडावुनवर पोलीसांनी पंचासह दुपारी २ वाजण्याचे सुमारास अचानकपणे छापा मारला असुन छाप्यामध्ये विविध प्रकारचे एकुण ५,६९,८००/- रुपयाचा गुटखा व प्रतिबंधीत तंबाखुजन्यं पदार्थ जप्त केले आहेत.

वरील कार्यवाही मा. उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार साहेब यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शेख, सहा. पोलीस निरीक्षक राम घाडगे, पोलीस नाईक भाऊसाहेब पौळ, अजीज शेख, इरफान शेख, पोलीस अंमलदार परमेश्वरं कदम, अनिल भोसले, असाराम खाडे, गोविंद मोटेगावकर तसेच महीला पोलीस अंमलदार क्षीरसागर यांचे पथकाने केली.

---

# कोटलिंग पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज चिकलठाण येथे जागतिक योग दिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : २१ जून जागतिक योग दिनाची औचित्य साधून श्री कुठलिंग प्रतिष्ठान संचालित कोठडींग पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज चिकलठाण या प्रशालेमध्ये जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रशालीतील इयत्ता पहिली इयत्ता चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांना सहभाग घेतलेला होता.

सर्वप्रथम जागतिक योग दिना बद्दल विद्यार्थ्यांना हराळे सर यांनी माहिती सांगितली तसेच रोकडे मॅडम व नवरे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सूर्यनमस्कार, पद्मासन, वृक्षासन, ताडासन, भुजंगासन, अशा वेगवेगळ्या योगाचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दिले विशेष म्हणजे सर्व विद्यार्थ्यांबरोबर प्रशालेतील सर्व शिक्षक देखील यामध्ये सहभाग घेतलेला होता.

# कळंब येथे उपविभागीय अधिकारी कार्यालया समोर छावा संघटनेचे उपोषण सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यात सप्टेंबर २०२५ मधील अतिवृष्टीतील नुकसान भरपाईत झालेल्या कथित पंचनामा घोटाळ्याची चौकशी आणि कळंब - खामसवाडी रस्त्यालगत झालेल्या बेकायदेशीर झाड तोडीवर कारवाईच्या मागणीसाठी आजपासून अखिल भारतीय सेवा संघटनेच्या वतीने संघटनेचे कळंब तालुकाध्यक्ष विठ्ठल यादव यांनी उपोषण सुरू केले आहे. उपोषणकर्त्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, सप्टेंबर २०२५ मधील अतिवृष्टीत तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांच्या विहिरी, शेतजमीन व पिकांचे मोठे नुकसान झाले होते. शासनाने जाहीर केलेल्या मदतीसाठी करण्यात आले पंचनामे चुकीचे, अपूर्ण व संशयास्पद असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे खऱ्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित ठेवण्यात आल्याचे आणि काही ठिकाणी अस्तित्वात



नसलेल्या विहिरींचेही बोगस पंचनामे झाल्याचे निवेदनात म्हटले आहे.

त्याचबरोबर कळंब ते मोहा, कळंब ते गोविंदपूर आणि गोविंदपूर ते खामसवाडी या रस्त्यांच्या कडेला असलेली झाडे तोडून रस्त्याला लागूनच लाईटचे पोल उभारण्यात आल्याने वाहन चालकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. संबंधित कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, सामाजिक वनीकरण व वन विभागाची परवानगी घेतली आहे का, तसेच रस्ता सुरक्षा व पर्यावरण नियमांचे पालन झाले आहे का, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

उपोषणकर्त्यांच्या प्रमुख मागण्या:

अतिवृष्टीतील नुकसानग्रस्त विहिरींच्या पंचनाम्यांची उच्चस्तरीय चौकशी करावी, बोगस पंचनामे रद्द करून दोषींवर कारवाई करावी, वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांचे पुन्हा पंचनामे करून मदत द्यावी, रस्त्यालगतचे धोकादायक पोल सुरक्षित अंतरावर हलवावेत, बेकायदेशीर झाडतोडीप्रकरणी पर्यावरण कायद्यानुसार कारवाई करावी.

प्रशासनाने १५ दिवसांत चौकशी समिती नेमून अहवाल सादर न केल्यास उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

या पुर्वी जिल्हाधिकारी धाराशिव, मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार व संबंधित विभागांना यासंदर्भात निवेदन सादर करण्यात आले आहे.

# पंढरपूर शहरातील योग संस्थांच्या वतीने जागतिक योग दिन साजरा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका व शहरांमध्ये जागतिक योग दिनाच्या निमित्ताने, तालुका प्रशासन, पांडुरंग परिवार, पतंजली योग योग संस्था, श्री विठ्ठल रुक्मिणी योग प्राणायाम संस्था, निसर्ग उपचार संस्था यांच्या वतीने आरती मंडप प्रांगणात येते जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी तहसीलदार सचिन लंगोटे, युवक नेते अँड प्रणव परिचारक, पीएसआय गोसावी पंढरपूर अर्बन बँकेची माझी चेअरमन रा .पा. कटेकर अँड प्रणव परिचारक, पतंजली योग संस्थेची सुरेंद्र पिसे, अँड सुनील वाळूजकर, ज्योतीताई शेटे अमृता परिचारक, वृक्ष पल्ली ग्रुप सोमनाथ होरने, जनता पार्टीचे शहराध्यक्ष रोहित लाला पानकर, यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतमातेचे पूजन करण्यात आले. उद्योग प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलताना तहसीलदार सचिन लंगोटे म्हणाले की २१ जून हा संपूर्ण जगात जागतिक योग दिन म्हणून साजरा केला जातो. मानवी शरीर आणि मनाच्या आरोग्यासाठी, योगाचे मोटू पतलू देणे ह्या दिनाचा योग महत्वाचे आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ रोजी संयुक्त राष्ट्राचा महासभेत जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. या प्रस्तावाला १७७ देशाने पाठिंबा दिला. ७५ दिवसात या प्रस्तावाला मंजुरी मिळाली.

आणि २१ जून २०१५ रोजी पहिला जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे स्वागत सुरेंद्र पिसे व प्रास्ताविक अँड सुनील वाळूजकर, योग शिबिर सूत्रसंचालन ज्योती शेटे, आभार प्रदर्शन उमा महाविद्यालयाचे प्राचार्य बाळ सर यांनी मांडले, हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉक्टर संजय देशपांडे मधुकर सुतार, प्रशांत आगवणे, रवींद्र कोडक, त्रिभुवन तारे निसार भाई शेख, चंदुलाल सुपेकर, आप्पासाहेब मुस्लिम, अँड रामलिंग कोष्टी, कांतीलाल सुपेकर गजेंद्र माने, गणेश काळे यांनी प्रयत्न केले, एवढी पंढरपुरातील योग साधक संस्थेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एकूण ३ लाख २५ हजार रुपयाची विदेशी दारू पंढरपूर तालुका पोलिसांनी केला जप्त

# पंढरपूर तालुका पोलिसांची धडाकेबाज कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/ प्रतिनिधी : दि २३ जून २०२६ रोजी आगामी काळातील सण उत्सव आषाढी वारीच्या अनुषंगाने पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे पुळुज या गावी माननीय सहायक पोलिस अधीक्षक श्री प्रशांत डगळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलिसांनी रेड करून एकूण २५ बॉक्स रॉयल चॅलेंज रॉयल स्टॅग रोमॅनो असे वेगवेगळ्या कंपनीचे एकूण तीन लाख २५ हजार रुपयाची विदेशी दारू पंढरपूर तालुका पोलिसांनी आरोपी नामे अन्सार शेख वय ५० वर्षे राहणार पुळूज तालुका पंढरपूर याचे घराच्या बाजूला असलेल्या खोलीतून जप्त केली आहे आरोपी अन्सार शेख राहणार पुळुज याच्याविरुद्ध मुंबई दारूबंदी अधिनियम ६५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे

पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त करण्यात आलेल्या दारूची किंमत ३लाख २५ हजार रुपये इतकी आहे.

सदरची कामगिरी माननीय पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी साहेब माननीय अप्पर पोलीस अधीक्षक श्री विजय कवाडे साहेब माननीय सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री प्रशांत डगळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर पोळि भारत भोसले निलेश गायकवाड पोलीस हेडकॉन्स्टेबल दीपक भोसले मंगेश रोकडे पोलीस कॉन्स्टेबल सागर गवळी संतोष चव्हाण विजयकुमार आवटी चालक पोलीस कॉन्स्टेबल महेश गोडसे हासन नदाफ यांच्या पथकाने केली आहे



# यमाई तलाव लगतची जागा गोशाळेसाठी मंदिर समिती देण्याचा निर्णय रद्द करावा

## निर्णय रद्द न केल्यास एक जुलै रोजी प्रांत कार्यालय मोर्चा काढणार; जिल्हाधिकारी व प्रांताधिकाऱ्यांना याबाबत दिले होते निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरातील रमाई तलावा लगतची ३.१२ हेक्टर ही जागा मधील समितीची गोशाळेच्या विस्तारीकरणाबाबत देण्याचा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रस्ताव शासनाकडे सादर करावा असे सांगितले होते. यावेळी पंढरपूर नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष व सर्व नगरसेवकांनी सदरची जागा व शाळेसाठी देऊ नये म्हणून, जिल्हाधिकारी कीर्तीकेयन व प्रांताधिकारी सचिन इथापे यांना निवेदन दिले होते. पंढरपूर शहरातील नागरिकांचा विरोध असून, पुन्हा म्हणजे समिती व शाळेसाठी जागा देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे पंढरपूरमध्ये अतिशय तीव्र संताप व्यक्त होत आहे. आज पंढरपूर मध्ये राजकीय सामाजिक पर्यावरण पूरक संघटना एकत्र येऊन सर्वांचे शासनाच्या निर्णयाचा विरोध बैठकीच्या आयोजन केले होते.

पंढरपूर नगरपालिकेच्या निधीतून यमाई तलावाची देखभाल पूर्वीपासूनच केली जाते. तसेच राज्य सरोवर संवर्धन अंतर्गत माझी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार आणि माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या प्रयत्नातून तलावाचे सुशोभीकरण पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्यात आले आहे. सध्या या ठिकाणी वॉकिंग ट्रॅक ,व तुळशी वृंदावन, असेच पक्षी निरीक्षणासाठी वॉच टॉवर, आले असून हजारो महिला पुरुष व्यायामासाठी व विरंगळयासाठी येतात. तलावर देशी विदेशी पक्षी व औषधी वनस्पतीची झाडे येथे आहेत. फळांची व जुने झाडे ही आहेत.

मंदिर समितीकडे वाखरी गोपाळपूर, अनवली ,पंढरपूर, तरी अनेक ठिकाणी मंदिर समितीच्या जमिनी उपलब्ध आहेत. त्या जागेवर गोशाळा उभारणी अधिक योग्य. आहे.

वरील सर्व विचार करता यमाई तलावाची गोशाळेसाठी जागा देणेही शहराच्या विकासाच्या व नागरिकांच्या गीता विरुद्ध आहे. शासनाने दिलेली मंजुरी तात्काळ रद्द करण्यात यावी. अन्यथा या सरकारच्या विरोधात पंढरपूर नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष व नगरसेवक व राजकीय सामाजिक संस्था व पर्यावरण पूरक संस्था त्यामुळे तलाव बचवण्यासाठी पंढरपूर शहरातील नागरिक लक्ष वेधण्यासाठी एक जुलै २०२६ प्रांत कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल अशी माहिती नगरसेवक अँड. सुनील वाळुंजकर यांनी दिली



यावेळी उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे गटनीती भागवत बडवे, नगरसेवक अँड सुनील वाळूजकर, अमोल डोके धर्मराज घोडके, माजी नगरसेवक किरण गाडगे, गुरुदास अभ्यंकर, तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे अध्यक्ष सुधीर धुमाळ, सुप्रभात ग्रुपचे मंगेश गांगवे, वृक्षप्रेमी ग्रुपचे सोमनाथ होरणे, सौदागर मोडक, संतोष पवार सुभाष शिर्के, अँड रामलिंग कोष्टी, आणि तीव्र निषेध नोंदवला, यावेळी सामाजिक कार्यकर्ते शरद माने अशोक शिंदे, माजी नगरसेवक विवेक परदेशी सचिन कुलकर्णी, योग साधक पर्यावरण प्रेमी वृक्षप्रेमी सदाशिव उपस्थित होते.

---

## फुले दांपत्यांचा विचार घराघरात पोहोचवा; खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विशेष ऑनलाइन संवाद सभेत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी मी सावित्रीबाई ज्योतिराव फुले या मालिकेसंदर्भात सविस्तर मार्गदर्शन करत फुले दांपत्यांचा विचार घराघरात पोहोचविण्यासाठी समाजाने एकजुटीने पुढे येण्याचे आवाहन केले. गुगल मिटच्या माध्यमातून आयोजित या सभेला राज्यभरातील संघटनेचे पदाधिकारी, शिक्षक बांधव तसेच ओबीसी बहुजन समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपले होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक संघटनेचे सरचिटणीस संतोष भोजने यांनी केले. सूत्रसंचालन प्रतिभा क्षीरसागर-कदम यांनी तर आभार प्रदर्शन लहू राक्षे यांनी केले.

_मार्गदर्शन करताना खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी मी सावित्रीबाई ज्योतिराव फुले या मालिकेची निर्मिती, तिचा उद्देश, समाजप्रबोधनातील भूमिका तसेच मालिका बंद होण्यामागील विविध घडामोडी यांचा सखोल उहापोह केला. स्टार प्रवाह वाहिनीवरून ही मालिका बंद करण्यात आली असली तरी ती सध्या मराठी वारसा या यूट्यूब चॅनलवर उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी दिली.

प्रश्नोत्तराच्या सत्रात उपस्थित पदाधिकारी व शिक्षकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना उत्तरे देताना डॉ. कोल्हे यांनी मालिकेचा सर्व अंगांनी परामर्श घेतला. मालिकेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, सामाजिक परिणाम, प्रबोधनात्मक भूमिका, प्रसारणाशी संबंधित अडचणी आणि पुढील वाटचाल याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली. समाजाच्या इतिहासाशी आणि महापुरुषांच्या कार्याशी संबंधित विषय अधिक व्यापकपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी ओबीसी बहुजन समाजातील सर्व नागरिकांना मराठी वारसा यूट्यूब चॅनल मोठ्या प्रमाणावर सबस्क्राईब करण्याचे आवाहन केले. फुले दांपत्यांचे विचार, त्यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यासाठी ही मालिका अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

सभेच्या शेवटी उपस्थितांनी डॉ. अमोल कोल्हे यांच्या मार्गदर्शनाबद्दल समाधान व्यक्त केले. फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांच्या प्रसारासाठी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ अधिक जोमाने कार्य करेल, असा निर्धार प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले यांच्यासह सर्व पदाधिकारी यांनी व्यक्त केला.

---

## मंगळवेढा नगरपरिषदेमध्ये आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त एकल महिला दिवस उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : संयुक्त राष्ट्र संघाने निश्चित केलेल्या २३ जून आंतरराष्ट्रीय विरवा दिनानिमित्त महाराष्ट्र शासनामार्फत प्रस्तावित राज्य एकल महिला धोरणाच्या अनुषंगाने मंगळवेढा नगरपरिषदेच्या वतीने एकल महिला दिवसचहा पूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला नगराध्यक्ष सुनंदा अवताडे, उपनगराध्यक्ष येताळ भगत तसेच मुख्याधिकारी सुमित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमांमध्ये विधवा या शब्दावरून सन्मानपूर्वक एकल महिला दिवसपुढचा पूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला नगराधेक्षा सुनंदा अवताडे होणारे येतात तसेच मुख्य अधिकारी सुमित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमांमध्ये एकल महिला ही संज्ञा वापरून शहरातील महिलांना






सहभागी करून घेण्यात आले या कार्यक्रमाचे अधिक छान महिला व बालकल्याण सभापती विजया अरुण घुगे यांनी भूषवले कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले यावेळी महात्मा फुले यांनी महिला सक्षमीकरण या सामाजिक न्यायासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात आला अध्यक्ष वाचनामध्ये सभापती विजया गुंगे यांनी एकल महिलांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन आर्थिक व सामाजिक दृष्ट्या सक्षम बनत स्वतःच्या पायावर उभे राहावे असेही आव्हान केले महिलांनी स्वावलंबन स्वीकारून बचत गट,रोजगार भूषण पुरवर्गाच्या संधीचा लाभ घ्यावा असेही त्यांनी सांगितले कार्यक्रमांमध्ये उपस्थित लेखन महिलांशी संवाद साधून त्यांच्या समस्या अडचणी अपेक्षा तसेच शासनामार्फत आवश्यक असलेल्या उपाय नाव बाबत चर्चा करण्यात आली महिलांच्या विविध शासकीय कागदपत्र बाबतच्या येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या व त्यांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात आली तसेच आपले सरकार पोर्टल व इतर शासकीय माध्यमातून त्या अडचणी सोडवण्यासाठी मदत करण्याची आश्वासन देण्यात आले महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी रोजगार स्वयंरोजगार उपजीविकेच्या संधी बाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे बचत गटांमध्ये सहभागी असलेल्या महिलांना बचत गटांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले रोजगार निर्मिती हिंदी बाबत माहिती देण्यात आली.

यावेळी समाजामध्ये एकल अथवा विधवा महिलांना रूढी परंपरेच्या आधारे दुय्यम वागणूक दिली जाणार नाही यासाठी स्थानिक स्तरावर जनजागृती करण्यात आली तसेच प्रास्तावित राज्य एकर महिला धोरणामध्ये समाविष्ट करण्यात येणाऱ्या विविध बाबीवर उपस्थित महिलांची मते व चिकना अपेक्ष जाणून घेऊन त्या महिला जिल्हा बाल विकास अधिकारी यांच्याकडे पाठवण्याबाबत कारवाईक येणार असल्याचे त्यांनी सांगण्यात आले या उपक्रमामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी अधिकारी व कर्मचारी यांच्यामध्ये एकल महिलांचा प्रश्नाबाबत अधिक समिती चिंता निर्माण होईल महिलांना विविध शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यास मदत होणार असल्यास विश्वास व्यक्त करण्यात आला या कार्यक्रमातील व्यापक प्रसिद्धी करून अंगणवाडी सेविका महिला बचत गट अशा सेविका स्थानिक यंत्रणेमार्फत महिलांचा सहभाग वाढवण्यात आलाय उपस्थित महिलांसाठी अल्पभार व चहाची व्यवस्था देखील करण्यात आली. यावेळी नगरसेविका सावित्रीबाई कोंडुभैरी सीमा बुरंगे, अश्विनी धोत्रे मनीषा मेटकरी, नगरसेवक सोमनाथ माळी कार्यालय अधीक्षक तृप्ती रसाळ, अशीच गीता गाडेकर पौर्णिमा कांबळे महानंदा धुमाळ तेजस्विनी सूर्यवंशी, नितेश रणखांबे इनुस मोगल, राजेंद्र खताळ अमोल वस्त्रे स्वप्नील बघ रे वैभव मुंडे वैशाली माने नवनाथ जगदाळे अशा पाटील सुनीता चव्हाण इतर पदाधिकारी कर्मचारी महिला उपस्थित होत्या.

---

## धाराशिव येथे एस.पी.सी.कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना सुरक्षा व शिस्तीचे मार्गदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/धाराशिव : धाराशिव शहरातील नवीन माध्यमिक विद्यालय, रजा कॉलनी येथे (स्टुडंट्स पोलिस केडेट) एस.पी.सी. कार्यक्रमाच्या अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे आयोजन पोलिस अधीक्षक श्रीमती रितू खोखर आणि अप्पर पोलिस अधीक्षक श्री सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना पोलिस विभागाचे कार्य, शिस्त, कर्तव्य आणि समाजातील पोलिसांची भूमिका याबत सविस्तर माहिती देण्यात आली. पोलिसांना सहकार्य करणे ही प्रत्येक नागरिकांची जबाबदारी असल्याचेही आवर्जून सांगण्यात आले.

शाळकरी मुले ही अपहरणकर्त्यांचे सहज लक्ष्य ठरू शकतात, त्यामुळे मुलांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. तसेच अनोळखी व्यक्तींशी बोलणे टाळावे, एकटे जाऊ नये, संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित शिक्षक अथवा पोलिसांना कळवावे, असे आवाहन करण्यात आले. शाळेच्या परिसरात (सी. सी. टी. व्ही.) यंत्रणा बसवून सुरक्षा वाढवण्यावर भर देण्यात आला.



आपल्याला वाचवू शकते. कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी ११२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असेही सांगण्यात आले.

(एस.पी.सी) कार्यक्रमाचे स्वरूप, कार्यपद्धती आणि पोलीस नाईक अतिश सरफळे यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग तसेच २०० ते २५० ते विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

**परिसरात पसरली दुर्गंधी, आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर**

## नालेसफाई की हातसफाई ? पहिल्याच पावसात विक्रोळी पार्कसाईट, रामनगर मध्ये नालेसफाईची पोलखोल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : विक्रोळी पार्कसाईट,रामनगर,डकलाईन या परिसरात पहिल्याच पावसात गटारे व्यवस्थितरित्या साफ न झाल्यामुळे गटारांतील सर्व घाण पाणी रस्त्यावरून वाहत थेट नागरिकांच्या घरांमध्ये शिरल्याने येथील सर्व स्थानिक रहिवाशांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.मुंबई महानगरपालिकेकडून नालेसफाईची कामे पूर्ण झाल्याचा दावा केला जात असताना प्रत्यक्षात परिसरात गटारे तुंबणे आणि गटारांचे सांडपाणी बाहेर येण्याच्या घटना घडल्यामुळे नागरिकांनी प्रशासनाच्या नालेसफाईच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.





स्थानिकांच्या मते,विभागातील सर्व छोटी मोठी गटारे,नाले पूर्णपणे साफ न झाल्यामुळे गटारातील साचलेली घाण एकत्रितपणे रस्त्यावर आल्याने अनेक घरांमध्ये दुर्गंधीयुक्त पाणी शिरले.यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून काही जणांच्या मालमत्तेचेही नुकसान झाले आहे.तसेच गटातील सर्व घाण रस्त्यावर आल्यामुळे रस्ते पूर्ण कचऱ्याने व्यापून गेले होते.परिणामी स्थानिक नागरिकांना रस्त्यावरून चालणे देखील कठीण होत होते.दरम्यान,नालेसफाईची कामे करणाऱ्या आणि करोडो रुपयाचे टेंडर घेणाऱ्या संबंधित विकास इंटरप्रायजेस कंत्राटदार कंपनी आणि त्यांचे सब कॉन्ट्रॅक्टर यांच्या कामकाजावरही प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत.काही नागरिकांनी नालेसफाईच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा आरोप करत मनपा एन विभाग संबंधित मेंटेन्स विभागाच्या अधिकाऱ्यांच्या या प्रकरणी चौकशी करून नालेसफाईच्या कामांचे ऑडिट करण्याची मागणी केली आहे.महापालिका नालेसफाई १०० टक्के पूर्ण झाल्याचा दावा करत असेल तर विक्रोळी पार्कसाईट,रामनगर,डकलाईन येथील हे चित्र नेमके काय दर्शवते? ही नालेसफाई आहे की हातसफाई? असा सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.नागरिकांनी या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून नालेसफाईच्या कामांची प्रत्यक्ष पडताळणी करावी तसेच दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कंत्राटदारांवर कठोर कारवाई करावी,अशी मागणी केली आहे.पावसाळ्याच्या सुरुवातीलाच अशी परिस्थिती निर्माण झाल्याने आगामी काळात आणखी गंभीर समस्या निर्माण होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

---

## कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी थेट प्रवेश प्रक्रिया सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर, प्रतिनिधी : रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (स्वायत्त) येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. आणि एम.सी.ए. या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली असून इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी संपर्क साधण्याचे आवाहन महाविद्यालयाने केले आहे.

महाविद्यालयाला छ्उ कडून + मानांकन (उत्रझ ३.५१) प्राप्त असून रुसा (ठणड) योजनेअंतर्गत लाभार्थी महाविद्यालयाचा दर्जाही मिळाला आहे. महाविद्यालयात अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापकवर्ग, अकरावी ते पीएच.डी. पर्यंत शिक्षणाची सुविधा तसेच विविध विषयांमध्ये पदव्युत्तर आणि संशोधनाच्या संधी उपलब्ध आहेत.

विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह, केंद्र व राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती योजना, सुसज्ज ग्रंथालय, आधुनिक संगणक प्रयोगशाळा, डिजिटल वर्गखोल्या, एनसीसी व एनएसएस उपक्रम, ऑन-कॅम्पस प्लेसमेंट सुविधा, पोलीस व आर्मी भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र तसेच कौशल्याधारित अभ्यासक्रमांची सोय करण्यात आली आहे.

प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज, गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, जात प्रमाणपत्र (लागू असल्यास), गॅप प्रमाणपत्र (लागू असल्यास), आधार कार्ड आणि पासपोर्ट आकाराचे रंगीत फोटो सादर करावेत. प्रवेश कार्यालयाची वेळ सकाळी १०.३० ते दुपारी २.०० अशी आहे. अधिक माहितीसाठी एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. व एम.सी.ए. विभाग प्रमुखांशी तसेच महाविद्यालय प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी केले आहे.